"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 07, Issue: 05, Sept. – Oct.. 2020 eISSN NO. 2394-5362
Impact Factor (SJIF) – 5.266

# १८५७ च्या उठावात उलेमांची भूमिका

**प्रा.डॉ. अब्दुल्ला बासीत चाऊस**
सहाय्यक प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख,
डॉ. रफिक झकेरिया कॉलेज फॉर वुमेन्स,
औरंगाबाद (महाराष्ट्र)

**प्रस्तावना :**

भारतात इंग्रजांनी ज्या दिवशी आपला जुल्मी साम्राज्य स्थापन केले. त्या दिवसापासूनच उलेमांनी इंग्रजांच्या प्रखर विरोधाला सुरुवात केली. भविष्य काळात हा विरोध एका चळवळीच्या रुपात रुपांतरित झाला. भारताच्या ह्या स्वातंत्र्य चळवळीत उलेमांचाही सिंहाचा वाटा आहे. प्लासीची लढाई पासून ते १९४७ ला देश स्वतंत्र होईपर्यंत, ह्या चळवळीत उलेमांचा बहुमोल, सक्रिय योगदान त्यांनी आपल्या बलिदानाने, संपत्तीने, लेखनाने, भाषणानं व तन, मन, धनाने दिला. उलेमांची ही चळवळ फक्त भारतासाठीच नव्हे तर ती पाश्चिमात्य देश, इस्लामीक देश व पूर्ण आशियासाठी होती.

१८५७ चे 'गदर' या पंजाबी अर्थ 'इन्किलाब' (उठाव) आहे. ह्या स्वातंत्र्य लढ्याला आधुनिक भारताच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. उलेमांनी या लढ्याला आधुनिक भारताच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. उलेमांनी या लढ्याला चांगली दिशा प्रदान केली. स्वातंत्र्याचा खरा अर्थ सांगितला, देशासाठी व स्वधर्म रक्षणासाठी जिहाद का आवश्यक आहे, त्याचे विश्लेषण केले, जागृती, देशभक्ती, देशरक्षण इत्यादींची निर्मितीसाठी फतवे काढले. या कार्यात करीत असतांना उलेमांनी बलिदान दिले, फासीवर चढले, तुरुंगात गेले, अनेक कष्ट, यातना सहन केल्या परंतु या पवित्र कार्यापासून मागे फिरले नाही. उलेमांच्या कार्याच्या संदर्भात सावरकर म्हणतात, ''प्रभावी मौलवी, उलेमा जिहादचा प्रचार करण्यासाठी पुढेच आले. त्यांनी प्रत्येक गावात व खेड्यापाड्यात दौरे करुन जागृत निर्माण केली.'' १८५७ मध्ये हेन्री हॅमिल्टन यांनी आपले पुस्तक "Late Rebellion in India and Policy" मध्ये

लिहिले की, ''मी पूर्वी सांगितले होते की, १८५७ चे गदर घडविणारे हिंदू होते पण आता हे दाखविण्याचा प्रयत्न आहे की, गदर हे मुसलमानांच्या षडयंत्रामुळे झाले.''

हजरत उमर रज़िअल्लाह अन्हा, यांनी मानवाच्या गुलामींचा तीव्र विरोध केला. त्यांच्या शब्दांत, ''तुम्ही त्यांना (लोकांना) का गुलाम बनविले जेव्हा त्यांच्या आईने त्यांना जन्मापासुन स्वतंत्र जन्मेल'', इस्लाम धर्माने मानव गुलामीचा तीव्र विरोध केला. साम्राज्यवाद खऱ्या अर्थाने मानवाला गुलाम बनविण्याचे दुसरे नांव आहे.

इतिहासकार सय्यद कमालोद्दीन यांनी ''कैसर-उल-तारीख'' म्हणतात की, इस्लामांच्या अनुयायांना फासीवर लढकवण्यात आले, सतत सात दिवस सर्वसामान्य लोकांना कापण्यात आले ज्याचा हिशोब नाही, पुर्णपणे मुस्लिम वंशाला समाप्त करण्याचे त्यांचे ध्येय होते.'' १९५७ या लढ्यापूर्वी व नंतर उलमांनी व मुसलमानांनी भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले, व लढ्यात भाग घेऊन अविस्मरणीय कार्य केले त्यांची नावे खाली प्रमाणे आहे.

**१) मौलवी अज़िमउल्ला खाँ :**

१८५७ च्या संग्रामध्ये मौलवीची भूमिका फार महत्त्वाची होती. ते नानासाहेब पेशव्यांचे राजकीय सल्लागार होते. जेव्हा इस्ट इंडिया कंपनीने नानासाहेबांनी पेन्शन बंद केली त्यावेळी पेन्शन पुन्हा चालू करण्यासाठी मौलवींनी इंग्लंडचा दौरा केला. आपल्या या विदेशी दौऱ्यात त्यांनी इंग्रजांच्या विरोध परकीय राष्ट्रांची मदत घेण्याचाही प्रयत्न केला.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या मते ''१९५७ या महत्त्वाच्या नायकांमध्ये अज़िमउल्ला खॉन यांचे नांव सर्वात प्रकाशमय होते. ज्यांची बुद्धी सर्वात प्रथम स्वातंत्र्य युद्धाच्या कल्पनेने प्रभावित झाली त्यात अज़िमउल्ला खॉन यांनी महत्त्वाचे स्थान आहे.''

ह्या क्रांतीवीराने इंग्रज साम्राज्य नष्ट करण्याकरीता फार प्रयत्न केले भिन्न-भिन्न योजना आखल्या. त्यातूनच एक योजना त्यांची इंग्रजांच्या विरोधात अशी होती की,

इटली देशाचे गॅरीबाल्डी आणि इजिप्तच्या सरकारच्या साहय्याने इंग्रज साम्राज्य नष्ट करण्याची योजना होती. १८५७ या उठावानंतर त्यांच्या बद्दल काहीही माहिती मिळाली नाही.

**२) मौलाना रशीद अहमद गंगवही :**

खुत-बुल इर्शाद अहमद हे १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात हजरत मौलाना कासीम नानोतवी बरोबर संग्रामामध्ये सामील झाले. यामुळे ०९ महिन्यासाठी इंग्रजांच्या तुरुंगात बंद करण्यात आले होते. देवबंदची स्थापना करणाऱ्या लोकांच्या यादीत त्यांचे नाव समाविष्ट आहे. आपल्या समाजाच्या उज्वल भविष्यासाठी त्यांनी सतत कार्य केले. त्यांनी धर्मप्रचार व शिक्षणासाठी जीवनभर महत्त्वाचे कार्य केले. त्यांची रुची, ज्ञान, हदीस, फिका आणि तसव्वूफ मध्ये होती.

मौलाना आशिक इलाही मेरठी यांनी गंगवही बद्दल लिहिले की, १८५७ च्या संग्रामामध्ये त्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला. इंग्रजांविरुद्ध ''शामली बंड'' मध्ये जिहाद पुकारले, इंग्रजांनी मौलानाला अटक करण्यासाठी वारंट तेथुन मुजफ्फरनगरच्या तुरुंगामध्ये पाठवियात आले. ते तेथे ६ महिने तुरुंगात होते. हजरत मौलाना कासीम नानोतवी यांच्या निधनानंतर मौलानाला दारुल उलूमचे प्रमुख बनविण्यात आले. त्यांनी फिका आणि तसव्वुफ वर चौदा पुस्तके लिहिली.

**३) मोगल सम्राट बहादुर शाह ज़फर (१७७५-१८६२):**

अबू-सिराजोद्दीन मोहम्मद बहादुर शाह जफर मोगल साम्राज्याच्या शेवटचा सम्राट होय. त्यांच्या वडिलांचे नाव अकबर शहा सानी (द्वितीय) होते. ऑक्टोबर ३०, १७७५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांच्या आईचे नाव राणी लाल बाई (हिंदू) असे होते. सप्टेंबर १८, १८३७ ला मुगल सम्राट बनण्याचा मान मिळाला. १८५७ च्या संग्रामाचे नेतृत्त्व बहादुर शाह जफर यांनी केले. पराजयानंतर हुमायूनच्या मकबऱ्यातुन त्यांना अटक करण्ण्यात आली. २१ सप्टेंबर १८५७ न्यायालयामध्ये त्यांच्या विरुद्ध खटला भरण्यात आला. त्यांना मलेका जीनत महल (राणी) व मुलगा जवान बख्त

"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 07, Issue: 05, Sept. – Oct.. 2020 eISSN NO. 2394-5362
Impact Factor (SJIF) – 5.266

यांना देशातून काढुन रंगूनला पाठविण्यात आले. इंग्रज राज्यकर्त्यांनी ६०० रुपये पेन्शन देण्याचे ठरविले, पण बादशाहाने पेन्शन घेण्याचे नाकारले व शेवटचे दिवस अत्यंत हलाखीच्या अवस्थेत काढले. त्यांच्या नोव्हेंबर ७, १८६२ रोजी स्वर्गवास झाला. त्यावेळी जिभेवर हे शब्द होते.

''कितना बदनसीब है जफर दफन के लिए

दो गज जमीन ना मिल सकी कोहे यार में''

**४) मौलाना रहमतूल्लाह किरानवी मुहाजीर मक्की :**

किरानाचे नामवंत उस्मानी परिवारामध्ये मौलाना रहेमतुल्ला बिन खालील उर-रहमान च्या घरी १८१३ त्यांचा जन्म झाला. १८५७ च्या उठावाच्या काळात थाना भवन आणि किराना येथे लढण्याचे केंद्र स्थापन केले. इंग्रजांचा प्रतिकार करण्यासाठी त्यांनी 'मुजाहिदीन' नावाची संघटना स्थापना केली. ह्या संघटनेद्वारे शामलीच्या तहसीलदारावर हल्ला करण्यात आला. पुर्ण आत्मविश्वासाने त्यांनी इंग्रजांचा मुकाबला केला व क्रांतीकारकांना प्रशिक्षण देण्याचे महत्त्वाचे कार्य ही त्यांनी केले. १८५७ चा उठाव संपल्यानंतर ब्रिटिश पोलीस त्यांच्या शोधात होती. परंतु ते अत्यंत गुप्तपणे सऊदी अरेबियाचे शहर मक्का येथे गेले. तेथे मौलानांनी १८९० मध्ये ''मदरसा-ए-सवलत्या'' स्थापन केले. १ मे १८९१ ला मक्का येथे त्यांचे निधन झाले.

**५) मौलाना अहेमदउल्ला शहीद :**

१८५७ च्या स्वातंत्र्य युद्धात शहीदचा सिंहाचा वाटा आहे. गोवळकुड्याची शाही घराण्याशी त्यांचा जवळचा संबंध होता. शहीद कट्टर ध्येयवादी, उत्कृष्ट, साहसी राष्ट्रवादी आणि राष्ट्राभिमानी होते. १८५७ साली मौलानांनी इंग्रज साम्राज्याच्या भूमिकेविरुद्ध आपले विचार लखनऊ मध्ये व्यक्त करुन आपल्या भाषणाद्वारे भारतीयांमध्ये जागृती निर्माण केली. आग्रा येथे पोहोचल्यानंतर मजलिस-ए-उलेमा समाविष्ट होऊन राजकिय क्षेत्रात त्यांनी राजकिय रंग भरण्याचा प्रयत्न केला. मौलाना

अहमदउल्ला यांच्या स्वातंत्र्य चळवळीला बहुतेक उलेमानांची आर्थिक मदत केली व त्यांच्या चळवळीत ही ते लोक सामील झाले.

भारतात हिंदु-मुस्लिमांची एक सेना त्यांनी तयार केली परंतु ते ब्रिटिश सरकारच्या हाती लागले. त्यांना अटक करुन तुरुंगात टाकण्यात आले. जवळपास त्याच काळात १८५७ च्या संग्रामाची सुरुवात झाली. मौलाना सिकंदर शाहांनी आपल्या सहकाऱ्यासोबत जाबाद तुरुंगावर हल्ला करुन मौलाना सिकंदर शाहांनी आपल्या सहकाऱ्यासोबत फैजाबाद तुरुंगावर हल्ला करुन मौलाना अहमदउल्ला यांची सुटका केली. मौलाना अहमदउल्ला यांच्या समर्थकांबरोबर मोहम्मदी या खेड्यात आले तेथे त्यांनी आपल्या संघटनेची पुनर्बांधनी केली. ज्याचा मुख्य हेतू इंग्रजांचा प्रतिकार करणे होता. मोहम्मदी या ठिकाणी त्यांनी इंग्रजांच्या विरोधात पर्यायी सरकारीची स्थापना केली. नानासाहेब, डॉ. वझीर खान, जनरल बखत खॉंन, मौलाना लियाकत अली, मौलाना सरफराज अली, मौलाना फैजउल्ला बदायूनी इत्यादी सर्व पर्यायी सरकारमध्ये सामील होते. पवॉईच्या राजाच्या सहकार्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. जेव्हा मौलानांनी राजाच्या गढीत प्रवेश केला तेव्हा त्यांच्यावर गोळ्या झडण्यात आल्या त्यात ते शहीद झाले. राजा बलदेव यांनी मौलानांचा मृतदेह स्थानिक कलेक्टरच्या स्वाधीन केले ब्रिटिशांनी त्यांच्या शरीराला आगीत फेकून दिले. पवॉईच्या राजाला इंग्रजांनी ५० हजाराचे इनाम दिले व त्यांची प्रशंसा करुन राजाला प्रशंसा पत्र देखील देण्यात आले. (जुन ४, १८५८)

**६) मौलाना मुबारक अली :**

मौलाना मुबारक अली हाजीपूर जवळ जिल्हा मुजफ्फरपुरचे रहिवासी होते. मौलाना मुबारक अलीला सादिकपूर केंद्राचे देखरेखीचे पद सोपविण्यात आले. १८५७ च्या संग्रामामध्ये भाग घेणाऱ्या स्वातंत्र्य सेनानीवर खटले भरण्यात आले. ह्या खटल्यला अम्बाला कट खटला १८६८ असे म्हणतात या ख्याटल्यसंदर्भात मौलानांनी केस लढण्यासाठी उत्कृष्ट कार्य केले. १८६८ मध्ये त्यांना काळ्यापाण्याच्या तुरुंगात

पाठविण्याच निर्णय घेण्यात आला. तुरुंगात जाण्यापुर्वीच मौलानावर इतके अत्याचार झाले की, अंदमान जाण्यापुर्वीच त्यांच्या मृत्यु झाला.

**७) मुफ्ती सदरोद्दीन आजरहाद :**

मुफ्ती सदरोद्दीनचा जन्म १७८९ ला दिल्ली येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शेख लतीफउल्ला होते ते शहा अब्दुल अजीज मोहद्दीस दहेलवींचे शिष्य होते. मुफ्ती साहेबांच्या प्रसिद्ध विद्यार्थ्यांमध्ये हजरत मौलाना मोहम्मद कासिम नानोतवी, हजरत मौलाना शहीद गंगवही, मौलाना फैज-उल-हसन सहारनपुरी, मौलाना जुल्फेकार देवबंदी, मौलाना मोहम्मद मुनिर नानोतवी, नवाब सिद्दीक हसन खॉन आणि सर सय्यद अहमद खॉन इत्यादी होते. १८२७ मध्ये त्यांना सद-रुल-सुदुर आणि मुफ्ती-ए-देहली सारखे पद देयात आले ते पद त्यांच्याकडे १८५७ पर्यंत होते.

मुफ्ती सदरोद्दीन आजरदा यांनी १८५७ च्या संग्रामात भाग घेतला होता व त्यांनी 'फतवा-ए-जिहाद' वर स्वाक्षरी केली होती व त्या स्वाक्षरी बरोबर त्यांनी स्वाक्षरी बिलजबर (दडपणामुळे) लिहिले होते. ह्या दोन कारणांमुळे त्यांना अटक करण्यात आली व त्यांच्यावर खटला भरण्यात आला ते कार्य (स्वाक्षरी) मी माया इच्छेने केली नाही. तरीही त्यांना ६ महिने तुरुगांत राहावे लागले. नंतर तुरुंगातुन सुटका करण्यात आली. त्यांना जिवनदान मिळाले पण दुसऱ्या शिक्षा तशाच राहिल्या. नौकरी गेली, संपत्ती जप्त करण्यात आली. अनेक वर्षाच्या प्रयत्नानंतर अर्धी संपत्ती परत मिळाली. १६ जुलैला दिल्ली येथे त्यांचा मृत्यु झाला. दर्गा चिराग देहली येथे दफन करण्यात आले.

**८) मौलाना फजले हक खैराबादी :**

मौलाना विचारवंत व तत्वज्ञानी होते ते सफल लेखक ही होते. त्यांनी विविध पुस्तके लिहिली होती. ते आलीम, अरबी भाषेचे लेखक, कवी व विचारवंत होते. एका प्रतिष्ठित घराण्याशी त्यांचा संबंध होता. १८५७ च्या संग्राम सुरु होण्यापूर्वीच त्यांनी इंग्रजांच्या विरोधी वातावरण तयार करण्यासाठी खूप प्रयत्न केले. जनरल बखत

खाँनच्या पुढाकाराने त्यांनी इंग्रजांच्या विरोधात जिहादचा फतवा दिला. फतवा-ए-जिहादमुळे मुसलमानात इंग्रजांच्या विरोधात ज्वलंत भावना निर्माण झाल्या. १८५७ चा संग्राम थांबल्यानंतर दोन वर्षे ते अज्ञान वासात राहिले. ''फतवा-ए-जिहाद'' मीच लिहिला आहे आणि त्यावर मी आजही कायम आहे, असे सांगितले इंग्रज न्यायधिशाने हे ऐकल्यानंतर त्यांना आजीवन काळ्या पाण्याची शिक्षा दिली व अंदमानला पाठविण्यात आले. तेथे त्यांना साफ-सफाई व कचरा उलचण्याचे काम देण्यात आले. ऑक्टोबर १८६१ ला त्यांचे निधन अंदमान येथे झाले.

**९) इतर नामवंत उलेमा व क्रांतीकारी :**

भारताच्या स्वातंत्र्यासाठी उलेमा व क्रांतीकारी लोकांनी बलिदान दिले त्यांचे नावे खालील प्रमाणे आहेत. मौलाना कासीम नानोतवी, मौलाना महेमुद-उल-हसन, मौलाना उबैद-उल्ला सिन्धी, मौलाना अजीमउल्ला खॉन, मौलाना लियाकत अली दलाहबादी, मौलाना किफायत अली शहीद, हजरत हाजी इमदादउल्ला, सय्यद अहमद शहीद, मौलाना फैज अहमद बदायूनी, मौलाना वहाजोद्दीन मुरादाबादी, मौलाना मुफ्ती इनायत अहमद काकोरी, मौलाना सय्यद आलम अली, मौलाना जलील, काझी अ. रहीम थानवी, मीर निसार अली, तेतूमीयाँ, मौलाना जाफर थानसरी इ.

**निष्कर्ष :**

१८५७ च्या उठावात मुस्लिम उलेमा व क्रांतीकारकांची भूमिका मुख्य होती, या उठावामध्ये त्यांना यश मिळाले नाही कारण इंग्रजांनी आपल्या शक्तीशाली बळाने हे उठाव दडपून टाकले. दिल्ली ताब्यात घेतल्यानंतर इंग्रजांनी दिल्लीच्या बाजार, चौकामध्ये व प्रत्येक रस्त्यावर मुसलमानांना ठार करण्यास सुरुवात केली. जिकडे तिकडे त्यांचे मृतदेह फेकुन दिले. दिल्ली, मेरठ, लखनऊ व इतरी ठिकाणी मुसलमानांना फाशी देण्यात आल्या. त्यांचे मुंडके झाडावर लटकवण्यात आले. त्यांची संपत्ती जप्त करण्यात आली. त्यांची घरेदारी उद्धवस्त करण्यात आले. प्रत्येक मुसलमानांना ते क्रांतीकारी समजत असे, त्यांची ओळख पटताच त्यांना गोळ्या घालून ठार मारण्यात येत असे.

डॉ. विल्यम या इंग्रज अधिकाऱ्याने म्हटले की, ''भारतातील मुसलमानांमध्ये इंग्रजाविरुद्ध जिहादची भावना उलेमांनीच निर्माण केली आहे. त्यामुळे त्यांनी १८६१ मध्ये तिन लाख कुराणाच्या प्रती जाळल्य १८५७ च्या लढ्यात दोन लाख मुस्लिम (शहीद) हुतात्मे झाले. या मध्ये ५१ हजार उलेमांचा समावेश होता.''

आजची भारतीय तरुण मोजक्या स्वातंत्र्य सैनिकांशी व हुतात्म्यांशीच परिचत आहे, पपण नामवंतांच्या बरोबरीचे व यांच्या स्थराचे क्रांतीकारी व देशभक्त आहे. ज्यांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्याकरीता प्रत्येक क्षेत्रात बलिदान दिले आहे. असे क्रांतीकारी व हुतात्मे झाले व त्यांनी हे कार्य स्वातंत्र्याच्या शेवटपर्यंत चालू ठेवले, अशा काहीं क्रांतीकारी व हुतात्म्यांची ओळख करुन देणे व इतर क्रांतीकारी व हुतात्म्यांबद्दल माहिती प्राप्त करुन घेण्याची रुची निर्माण करणे आणि असे उलेमा क्रांतीकारी व हुतात्म्यांना इतिहासात त्यांचा उचित स्थान आजचे इतिहासकारांनी द्यावा. त्यांच्या बद्दल समाजामध्ये जे गैरसमाज होता ते दुर करुन त्यांच्या बद्दल आदर व विश्वास निर्माण करणे हा माझा उद्देश आहे. या उलेमांनी, धर्म, समाज, देशासाठी जे बलीदान दिले त्याला नमण करणे व इतिहासात त्यांना सन्मानपूर्वक उचित स्थान मिळवून देणे व त्यांनी दाखविलेले आदर्श मार्ग स्विकारुन आधुनिक भारताचे निर्माण करणे ही खरी श्रद्धांजली भारताचे क्रांतीकारी उलेमांना अर्पण करणे माझा उद्देश आहे.

**संदर्भ सूची :**

१) म. सलमान मन्सुरपुरी, तहरीके आजादी-ए-हिन्द में मुस्लिम उलेमा और अव्वाम का किरदार, प्रकाशक : मरकज-ए-नशर व तहकीक, मुरादाबाद, प्र.व. २००१.

२) सावरकर वि.दा., ''१८५७ चा स्वातंत्र संग्राम'', वीर सावरकर, शिवाजी उद्यान, मुंबई - २८.

३) डॉ. मिर्झा मुहम्मद खिजर, ''तारीख के झरोंके से'', अख्तर पब्लिकेशन, अख्तर कदा, हिमायत बाग समोर, औरंगाबाद, प्र.व. २००४.

४) असीर अदरवी, ''तहरीक-ए-आजादी और मुसलमान'', प्र. दारुल मौलेफीन, देवबंद, प्र.व. २०००.

५) रिझवी खुर्शिद मुस्तफा, ''जंगे आजादी १८५७'', मकतब-ए- बुऱ्हान, जामा मशिद, दिल्ली, प्र.व. १८५९.

६) सय्यद मुहम्मद मियाँ, ''उलेमा-ए-हिंद का शानदार माजी'', मकतब-ए-बुऱ्हान, जामा मशिद, दिल्ली, प्र.व. १८५७.

७) डॉ. मोरवंचीकर रा.श्री., ''आधुनिक भारत'', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपुर, प्र.व. १९५९.

८) L.P. Sharma, "History of Modern India".

९) नोमानी हैदर अली, ''जंगे आजादी और मुसलमानों की कुरबानियाँ'', दानिश बुक डिपो टाण्डा अंबेडकर नगर, यु.पी., प्र.व. १९९८.